महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १३१ वे | दिनांक : ०६/०५/२०२६ | वार : बुधवार

## नसरापूर प्रकरणावरून वाद: राज ठाकरे व प्रवीण तरडे यांना असीम सरोदेंची फटकार



**पुणे** :नसरापूर येथील चिमुकलीवर झालेल्या अत्याचारामुळे जनमानसात तीव्र संतापाची लाट असली, तरी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लोकांना कायदा हातात घेण्यासाठी प्रवृत्त करणे चुकीचे असल्याचे मत ज्येष्ठ विधिज्ञ असीम सरोदे यांनी व्यक्त केले आहे. एका जबाबदार नेत्याने असे चिथावणीखोर वक्तव्य करणे अयोग्य असून पोलिसांनी त्यांना समज द्यायला हवी, अशी भूमिका सरोदे यांनी मांडली. तसेच, याप्रकरणी प्रवीण तरडे यांनी केलेल्या वक्तव्यावरही त्यांनी टीका केली असून, भावना कितीही तीव्र असल्या तरी आरोपीला कायद्याच्या चौकटीत राहूनच शिक्षा झाली पाहिजे, असे सरोदे यांनी म्हटले आहे.

असीम सरोदे म्हणाले की, नसरापूर या गावात एका ७५ वर्षांच्या नराधमाने चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या केली. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून त्या चिमुरडीच्या कुटुंबाचे दु:ख आपण कुणीही समजून घेऊ शकत नाही. त्या नराधमाला कठोर शिक्षा व्हावी अशी आपल्या सगळ्यांचीच इच्छा आहे. या केसमध्ये १०१ टक्के त्या नराधमाला फाशीची शिक्षाच होणार हे कायदेशीर वास्तव आपण समजून घेतलं पाहिजे.

पुढे बोलताना असीम सरोदे म्हणाले, या प्रकरणात काहीही बेताल वक्तव्य करत लोकांना कायदा हातात घेण्यासाठी प्रवृत्त करायचं आणि त्या माणसाला हालहाल करून मारा, आपणच त्याला शिक्षा देऊयात, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. त्याचप्रमाणे प्रवीण तरडे यांनीसुद्धा असे वक्तव्य केले. त्या आरोपीला मारणाऱ्याला आमदार खासदार करा असे प्रवीण तरडे म्हणाले. असे असेल तर प्रवीण तरडे स्वत:च का जात नाहीत? स्वतः त्या आरोपीला मारून आमदार आणि खासदार का होत नाहीत? आमदार आणि खासदार व्हायचे कायदेशीर निकष आता तुम्ही बदलणार का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

राज ठाकरे यांना उद्देशून बोलताना असीम सरोदे म्हणाले, तुमच्या भावना जरी बरोबर असल्या तरी कायद्याचे एक तत्व आहे. आरोपीला त्याची बाजू मांडू देऊन, कायद्याच्या प्रक्रियेतून प्रत्येकाला शिक्षा झाली पाहिजे. राज ठाकरे यांच्यासारख्या जबाबदार नेत्याने अशा प्रकारचे वक्तव्य करून लोकांना कायदा हातात घेण्यासाठी भडकवू नये. हे चुकीचे आहे. त्यामुळे अशा प्रकारची वक्तव्य करू नये अशी समज पोलिसांनी राज ठाकरेंनादिली पाहिजे. राज ठाकरे आणि प्रवणी तरडे यांनी केलेल्या या वक्तव्यामुळे त्यांच्यावर गुन्हाही नोंद होऊ शकतो, असे सरोदे यांनी म्हटले आहे.

नसरापूर येथील अमानवीय घटनेनंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संताप व्यक्त केला असून, या प्रकरणातील नराधमाला हाल हाल करून संपवले पाहिजे, अशी आक्रमक मागणी केली आहे. यासोबतच, महाराष्ट्रात सध्या कोणाचाच कोणाला धाक उरलेला नाही, अशा शब्दांत त्यांनी राज्यातील बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेवरून सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली आहे.




## सोलापुरात नवे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय: यंदापासून प्रवेश सुरू



**मुंबई** : सोलापूरला नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्लाय सुरु करण्यास व त्यासाठी सोलापुरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये या शैक्षणिक वर्षापासून (सन २०२६-२७) पदवीस्तरावरचे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनचे नाव यापुढे शासकीय अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्था (गव्हर्मेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँण्ड टेक्नॉलॉजी), सोलापूर असे करण्यास देखील मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

सरकारच्या निर्णयामुळे सोलापूर आणि आजुबाजुच्या परिसरातील अभियांत्रिकी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या होतकरूंच्या दृष्टीने महत्वांचे अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. या अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रत्येकी साठ अशी असेल. एआय अँण्ड मशिन लर्निंग, कॉम्प्युटर सायन्स अँण्ड इंजिनियरींग, इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन असे हे तीन नवे अभियांत्रिकी अभ्यासक्रम या शैक्षणिक वर्षापासून (सन २०२६ – २७) पासून उपलब्ध असणार आहेत. यामुळे या परिसरात सुमारे १८० विद्यार्थ्यांना या नव्या शैक्षणिक वर्षापासून सोलापूरमध्येच अभियांत्रिकीला प्रवेश घेता येणार आहे.

या नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापनेकरिता टप्पाटप्प्याने नव्याने नियमित शिक्षकांची ३९ पदे, शिक्षकेतर ३८ (यापैकी २२ नियमित व १६ बाह्ययंत्रणेद्वारे) पदे अशी पदनिर्मिती करण्यात येणार आहे. संस्थेच्या नवीन शिक्षक व शिक्षक पदावरील तसेच बांधकाम, यंत्रसामुग्री – उपकरणांकरिता अशा आगामी चार वर्षांतील सुमारे १५७ कोटी ६६ लाख दोन हजार रुपयांच्या खर्चाच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच या शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकीचे हे तीन पदवी अभ्यासक्रम सुरु होणार असल्याने इमारत दुरूस्ती, डागडुजी तसेच अन्य आवश्यक खर्चाकरिता म्हणून ११ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

दुसरीकडे, धाराशिवच्या तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिर संस्थानमार्फत चालविण्यात येणारे श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे कायमस्वरूपी हस्तांतरित करण्याचा निर्णयही राज्य मंत्रिमंडळाने आज हातावेगळा केला. संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी संस्थांनामार्फत चालविले जाणारे श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबत प्रस्ताव दिला होता. त्यावर उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पाच सदस्यीय समितीने या महाविद्यालयाच्या हस्तांतरणाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून सादर केला.

त्यानुसार महाविद्यालयाची जागा, इमारत आणि साहित्यासह शासनाकडे हस्तांतरित करण्यास आज मान्यता देण्यात आली. आता हे महाविद्यालय श्री. तुळजाभवानी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर, या नावाने ओळखले जाईल. सध्या या महाविद्यालयात सिव्हील (स्थापत्य) मेकॅनिकल (यंत्र अभियांत्रिकी), इलेक्टॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन (अणुविद्युत व दूरसंचार) आणि कॉम्प्युटर सायन्स (संगणक विज्ञान) असे अभ्यासक्रम सुरू आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०६ जुन २०२६


## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयाचा यशस्वी गौरव सोहळा



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात इयत्ता बारावी (HSC) परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या परीक्षेत महाविद्यालयाने उल्लेखनीय यशाची परंपरा कायम राखत विज्ञान शाखेचा ९३%, कला शाखेचा ६७%, वाणिज्य शाखेचा ६४% तसेच एच.एस.व्ही.सी. शाखेचा ८७% असा समाधानकारक निकाल नोंदवला.या निमित्ताने आयोजित सत्कार समारंभात विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिला जिरे व प्रा. त्रिपती वरपडे यांनी केले. प्रा. रवींद्र परभणे व प्रा. डॉ. अन्विता अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी केला, तर आभार प्रा. माधुरी भावसार यांनी मानले.महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत—कला शाखेतून कनका देशपांडे (८७.६६%), ईशानी कुलकर्णी (८५.१७%) व सोनिया हाजोंग (७०.६६%) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवले. वाणिज्य शाखेतून यश तोतला (९५%), देवश्री लोटांगणे (९४.३३%), मयुरी सूर्यवंशी (९३.१६%) व मयुरी फटांगडे (९०%) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांक पटकावला. विज्ञान शाखेतून शार्दुल जोशी (७७.३४%), शरयू मुधळवाडकर (७३.५०%) व सायली यादव (६७.८३%) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. तसेच एच.एस.व्ही.सी. शाखेतून गोकर्ण नालटकर (७१.६७%), रूपाली कांबळे (७०%) व दिशा आव्हाड (६८.३३%) यांनी विशेष प्राविण्य मिळवले. संस्कृत विषयात कनका देशपांडे, देवश्री लोटांगणे, सांची पाटणी व मयुरी फटांगडे तसेच आय.टी. याविषयात वाणिज्य - श्रेयश शैलेश टोटला, विज्ञान - सुदर्शन सुनिल वैराळे, ओसीएम याविषयात मयुरी विष्णू सूर्यवंशी, निकीता मकरंद वानखेडे, एसपी याविषयात देवश्री राजेंद्र लोटांगणे श्रेयश शैलेश टोटला या विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.या प्रसंगी प्राचार्य व शिक्षकवृंदांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी व पालकांनी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयातील गुणवत्तापूर्ण शिक्षण व सुरक्षित वातावरणाबद्दल समाधान व्यक्त केले.

## रासायनिक खतांची लिंकींग करणाऱ्यांचे परवाने रद्द करणार



**कन्नड (अरुण थोरात) :** खरीप हंगाम २०-२६ च्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना खते आणि बियाण्यांचा तुटवडा भासणार नाही याची दक्षता घ्यावी. युरिया खताची जादा दराने विक्री किंवा लिंकिंग करणाऱ्या बेकायदेशीर विक्रेत्यांची गय केली जाणार नाही. अशा तक्रारी प्राप्त होताच संबंधित विक्रेत्यांचे परवाने रद्द करून नवीन परवाने देऊ नका, असे स्पष्ट निर्देश आमदार संजनाताई यांनी दिले.दि.०४ मे रोजी कन्नड तहसील कार्यालयातील सभागृहात कृषी विभागाची तालुकास्तरीय खरीप आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.बैठकीत प्रशासकीय यंत्रणेचा आढावा घेण्यात आला.या बैठकीत उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार सारिका भगत, कृषी विभागाचे उपविभागीय अधिकारी (SDAO) सुभाष आघाव, तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ यांनी खरीप हंगामाचे नियोजन, उपलब्ध बियाणे साठा आणि खतांच्या पुरवठ्याबाबत सविस्तर प्रास्ताविक व PPT Presentation सादर केले. यामध्ये तालुक्यातील पीक पद्धती आणि शेतकऱ्यांच्या गरजांवर सखोल चर्चा करण्यात आली.बैठकीत सर्वाधिक चर्चा खत आणि बियाणे पुरवठ्यावर झाली. युरिया खताच्या वितरणात पारदर्शकता असावी, असा आग्रह आमदार संजनाताई जाधव यांनी धरला. "ज्या ठिकाणी बेकायदेशीर साठेबाजी किंवा लिंकिंगचे प्रकार घडत असतील, त्याची माहिती तात्काळ मला द्या, मी स्वतः त्यामध्ये लक्ष घालून कडक कारवाई सुनिश्चित करेन" असे त्यांनी यावेळी ठणकावून सांगितले. बैठकीस केतनभैय्या काजे, मा. जि.प.सदस्य किशोर आबा पवार यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सर्व सन्माननीय सदस्य, कृषी विभागाचे कर्मचारी आणि विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणेने समन्वयाने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903



ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०६ जुन २०२६


## राजर्षी शाहू महाराज

राजर्षी शाहू महाराज
महाराष्ट्राची खरी शान
तुमच्या अफाट कार्याचा
सर्व भारतीयांना अभिमान

दीनदलीतांना आपलेसे करूनी
छाया दिली ममतेची
जातीभेद नष्ट करुनी
शिकवण दिली समतेची

होते तुम्ही कलेचे आश्रयदाते
पाठीराखे शेतकऱ्यांचे
विद्वानांचे होते चाहते
कैवारी गोरगरीबांचे

अंधश्रद्धा व कर्मकांडांचा
केला तुम्ही नायनाट
दीनदुबळ्यांना आरक्षण देवूनी
दाखविली शिक्षणाची वाट

सक्तीचे आणि मोफत
दिले सर्वांना शिक्षण
प्रबोधनाचा वसा घेवूनी
केले लोककलेचे रक्षण

आयुष्यभर लोककल्याणाचा
घेतला होता तुम्ही वसा
जगभर तुमच्या कार्याचा
मनोमनी उमटला ठसा



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## सातबारा करा कोरा

साऱ्या जगाचा पोशिंदा,
माझा शेतकरी राजा.
सातबारा करा कोरा!
नका करू गाजावाजा. १

खूप त्रास होतो देवा,
किती सहन करावे.
कधी येणार मदत,
काय असेच मरावे. २

करू नका भांडवल,
पोट भरण्यास तुम्ही.
नाही राहिलो रे खुळे,
डाव ओळखतो आम्ही. ३

खूप झाले रे भाषण,
दिल्या वचनास जाग.
पूर्ण करा आश्वासन,
लावू बुडाखाली आग. ४

सोडणार नाही आता,
त्रास देणाऱ्यास पुन्हा.
शांत बसतो म्हणून,
करू नये कोणी गुन्हा. ५

रोज कसतांना शेती,
ओढाताण होते फार.
सातबारा करा कोरा
डोईवर झाले भार. ६



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# वाचन संस्कृती रुजवण्यासाठी "तिफण वाचन कट्टा" सुरू

**(कन्नड)** : वाचन संस्कृती वाढावी आणि नवे वाचक घडावेत या उद्देशाने तिफण वाचक चळवळीच्या वतीने आजपासून ऑनलाईन "तिफण वाचन कट्टा" सुरू करण्यात आला आहे. (ता. 5 मे )मोबाईल आणि स्क्रीनच्या युगात वाचनाची आवड कमी होत असल्याने ती पुन्हा निर्माण करण्यासाठी हा कट्टा व्यासपीठ ठरणार आहे. डॉ. शिवाजी हुसे यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या उपक्रमात सध्या ७६ वाचक सक्रियपणे सहभागी झाले आहेत. यात लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील वाचकांचा समावेश आहे.कट्ट्यावर काय होणार:- पुस्तकांवर चर्चा- कविता वाचन - पुस्तक परीक्षण- वैचारिक लेखांचे वाचन"तिफण" म्हणजे शेतात पेरणी करणारे साधन. जसे तिफणीने बी पेरल्यावर पीक येते, तसेच या कट्ट्याच्या माध्यमातून मनात वाचनाचे आणि विचारांचे बी पेरले जाईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.डॉ. शिवाजी हुसे यांनी नागरिकांना आणि मुलांना या वाचन चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. इच्छुक वाचक तिफण वाचक चळवळीशी संपर्क साधून कट्ट्याशी जोडले जाऊ शकतात. वर्षभर या उपक्रमात सहभागी होणाऱ्यांना ऑनलाईन उत्कृष्ट वाचक म्हणून प्रमाणपत्र देण्यात येईल. या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. शिवाजी हुसे यांनी केले आहे.

## जयभवानी महाविद्यालयाचा विद्यार्थी फाळके रेवण याची मुबंई पोलीस मध्ये निवड महाविद्यालयात सत्कार



**पाटोदा** : दिंनाक :४ मे: येथिल जय भवानी महाविद्यालयाचा बी.एस्सी चा विद्यार्थी फाळके रेवण बंडू याची नुकतीस मुबंई पोलीस भरतीत पोलीस पदावर निवड झाली. त्या बद्दल त्याचा महाविद्यालयाच्या वत्तीने महाविद्यालयात मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना फाळके रेवण यांनी सांगितले की महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे अनमोल मार्गदर्शन कामी आले. त्यामुळे लेखी परीक्षेत यश मिळविता आले. असे सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी फाळके रेवण यांनी स्पर्धेच्या काळात युवकापुढे आदर्श निर्माण केला आहे. भविष्यासाठी त्याला शुभेच्छा दिल्या! या सत्कार सोहळ्याचे संचलन प्रा. बाळासाहेब जोशी यांनी केले. तर आभार प्रा.शिवाजी भोरे यांनी मानले या प्रसंगी प्रा.डॉ. सुनिल जाधव, प्रा. सोमनाथ घाडगे, प्रा.डॉ.बंडू लोखंडे आदिची उपस्थिती होती.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

जाहिरात दर
१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०६ जुन २०२६


## बारावी बोर्डाच्या निकालात कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयाने रचला नवा इतिहास

**शिरूर कासार :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे,यांच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून शिरूर(कासार)येथील आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयाने बारावी बोर्ड परीक्षेच्या निकालात पहिल्यांदाच नवा इतिहास रचला आहे.यावर्षी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या संकल्पनेतून'श्री कालिका गुणवत्ता पॅटर्न' राबविला होता.त्यामुळेच विद्यार्थ्यांनी अभ्यासाची तयारी मोठ्या जिद्दीने आणि जोमाने केली होती.प्रथम क्रमांक मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा आणि चुरस निर्माण झाली होती.तेव्हा यावर्षी बोर्डाची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडली असूनही,मात्र 'श्री कालिका पॅटर्नने'बोर्डाच्या निकालातही आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे.तिन्ही शाखेतील एकूण ४५३ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते.त्यापैकी २३८ विद्यार्थी 'डिस्टिंक्शनमध्ये' आले आहेत.व १६० विद्यार्थ्यांनी 'प्रथम श्रेणीत'प्राविण्य मिळविले आहे.तर ३२विद्यार्थी हे द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.निकालाचा हा रेकॉर्ड ब्रेक आलेख पहिल्यांदाच दिसून आला.शाखा निहाय पाहिले तर,विज्ञान शाखेचा निकाल ९९.६८ % टक्के आहे.व कला शाखेचा निकाल ९८.१३ % टक्के आहे.तर वाणिज्य शाखेचा निकाल ९०.६२ % टक्के लागला आहे.या अगोदर असा निकाल कधीच लागला नव्हता.एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच निकाल लागल्यामुळे जिल्ह्यात व शिरूर (का.) तालुका व परिसरात प्राचार्य केशव भांगे साहेब व विद्यालयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.अशा या ऐतिहासिक निकालामुळे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव,तथा माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब, मा. रोहित (भैय्या) क्षीरसागर, प्रशासन अधिकारी डॉ.राजूजी मचाले साहेब,सहा.प्रशासन अधिकारी,मा.योगेशजी पवार साहेब,कार्यवाहक श्री एम.ए.राऊत सर,तसेच शिरूर (का.)पंचक्रोशीतील सर्व सूज्ञ पालक यांच्या वतीने विद्यालयाचे प्राचार्य,उपप्राचार्य,पर्यवेक्षक,सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, आणि उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक-हार्दिक अभिनंदन केले असून,त्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## लग्न मुहूर्त जवळ येत असतानाच आधीच वधूचे जिंतूरच्या बसस्थानकावरून पलायन



**जिंतूर (बी.डी.रामपूरकव) :** जिंतूर तालुक्यातील एका २२ वर्षीय मुलीचे लग्न कुटुंबातील सदस्यांची सहमती व स्वतः त्या मुलीच्या पसंतीने ०३ मे२०२६ त्याचा गावात होणार होते. लग्न पत्रिका नातेवाईकांना, मित्रमंडळींना व भावकीमध्ये वाटप ही झाल्या लग्न मंडप,वाजंत्री, जेवनावळीचा बेत ठरला बुधवारी दिनांक २९ एप्रील २०२६ रोजी होणारी वधू ही बामणी या गावातून आपल्या आई व लहान भावासोबत जिंतूर शहरात लग्नाच्या अत्यावश्यक खरेदीसाठी आली व दिवसभर खरेदी करून हे तीघेही सायंकाळी ६:०० च्या दरम्यान लग्नाचे सर्व साहित्य घेऊन जिंतूरच्या बस स्थानकावर आले. बामणी या गावाकडे जाणारी बस ही वेळेवर न आल्या मुळे भावी वधू ने आईला सांगितले की आई मी नैसर्गिक विधीला जाऊन येते.परंतु ती खूप वेळ न आल्याने त्याची आई शोध घेत सुटली परंतु मुलगी आढळून न आल्याने तिने हंबरडा फोडला.जिंतूरच्या बस स्थानकावर असलेल्या उपस्थित नागरिकांनी आजू बाजूच्या परिसरामध्ये शोध घेतला परंतु ती आढळून आली नाही.बराच वेळ शोध घेऊनही आपली मुलगी आढळून आली नसल्यामुळे तिने लग्नासाठी घेतलेल्या अत्यावश्यक वस्तू एका खाजगी बाईकडे ठेवून थेट पोलीस स्टेशन गाठले आईचा आक्रोश बघून उपस्थित नागरिक व महिलांचे डोळे पाणावले होते.

## अमर जवान शहीद सचिन वनंजे

तुझ्या पावलांनी धरती पावन झाली,तुझ्या त्यागाने माती सोनं झाली...
सीमेवर उभा राहून दिलास प्राण,
अमर जवान शहीद सचिन वनंजे, तूच महान... IN

अमर जवान शहीद सचिन वनंजे तुझ्या स्मृतीत नतमस्तक आम्ही...
तुझ्या बलिदानाचा दीप, मनामध्ये पेटतो आम्ही...
तू गेलास तरीही, हृदयात जिवंत आहेस...
भारताच्या प्रत्येक श्वासात तूच वसतो आहेस...

आई ***कलावती*** च्या डोळ्यांत अश्रूंची धार,
वडील ***यादवराव*** उभे अभिमानाने आधार...
पत्नी ***माधुरी*** च्या मनात आठवणींचा सागर,
तुझ्या प्रेमाचा सुगंध तिच्या श्वासात अमर...

अमर जवान शहीद सचिन वनंजे तुझ्या स्मृतीत नतमस्तक आम्ही...
तुझ्या बलिदानाचा दीप, मनामध्ये पेटतो आम्ही...

भाऊ ***दयानंद*** आणि ***प्रेमानंद*** हृदयात वेदना दाटून,
तुझ्या शौर्याच्या आठवणींनी उभे राहतात ताकद घेऊन...
लहानशी ***सानु*** हाक मारी "बाबा, कुठे आहात?"
तिच्या डोळ्यांत तुझंच जग उजळतंय सतत...

**मित्र परिवार तुझ्या*** आठवणींमध्ये हरवले,
हसरे क्षण डोळ्यांत अश्रूंनी भरले...
तुझ्या सोबतचे दिवस कधी विसरता येणार नाहीत,
तुझ्या स्मृतींचे दीप कायम उजळत राहतील...

***प्रदीप*** च्या शब्दांतून उमटते तुझी कहाणी,
भावनांच्या ओघात वाहते श्रद्धेची निशाणी...
तुझ्या शौर्याला शब्दांनी अर्पण ही वंदना,
तुझ्या स्मृतीतून उजळो सदैव प्रेरणा...

कश्मीरच्या वाऱ्यात तुझा श्वास आहे,
प्रत्येक सैनिकात तुझाच विश्वास आहे...
तू आहेस आमचा प्रेरणा स्रोत,
तुझ्यामुळे सुरक्षित आहे हा देश मोठा...

अमर जवान शहीद सचिन वनंजे, तुझ्या स्मृतीत दीप उजळतील कायम...
तुझ्या बलिदानाला सलाम आमचा नित्यनियम...
तू नसूनही, तूच आमच्यात आहेस...
भारत देश तुझ्यावर सदैव गर्व करते आहे...



\- **बोने प्रदीप रमेशराव**
९९२३१५६११८


**प्रतिनिधी नेमणे आहे**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.**

**दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.**




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०६ जुन २०२६


# एकसोबीस हरी पती लौंग आणि मी - संगीता अरबुने




**क**वयित्री कथाकार ललित लेखिका संगीता अरबुने वसई.ललित लेखनाचे एक सृजनशील कथन काव्यसुत्र असलेतरी अतिशय लालित्य हळुवारपणे तरल सुक्ष्म अनुबंध हे ललितलेखनाचे वैशिष्ट्ये आहे.प्रस्तूत ललितलेखनात लेखिकेने आपल्या जगण्यातील अस्सल अनुभव त्या अनुभवातून नात्यांचे बंध तर आहेच पण माणूस माणसापासून दूर होतं चालल्याची सखेद भावना येते.या ललितबंधात अतिशय सुंदर आशय घेऊन जरी गोष्ट येतं असली तरी जगण्याचं अस्सलपण बोली भाषेतून निर्भीडपणे व्यक्त झाले आहे.'बिन आईच्या मुलींना वळणंच नसतात'.अशी सखेद वेदनेची तीव्रता आली आहे.पण संस्कार शिदोरी मायाळू असते.या ललितलेखनाचे शिर्षक म्हणजे पानटप्परीवरील टोपोरी भाषा पण अभिजात शैलीचा अनुबंध असलेली.,'तिनसो एकसो बीस,जहिरीला तुफान' अशी एक नशाबाज भाषा असायची.पान खाये! सय्या हमारे,हा शाही नवाज दिमाखदार खासियत असायची.आजसर्वहराहा ही विवाहमध्ये पान ठेला जाणिवपूर्वक ठेवतात.नेमका हाच मुद्रांकित आठवण लेखिकेने ललितबधात गुंफला आहे.संभाजीनगर येथील 'तारा पानसेंटर' या महाराष्ट्रात प्रसिद्ध झालेला एक पानठेला.यातील अतिशय संवाद हे मैत्रीचे बंध रेशमाचे म्हणून आले आहेत.बालपणीच्या मनस्वी आठवणीचा अनुबंध सांगताना "आई तू का ग गेलीस..लेक नजरेत आड होताना,जी मनाची हुरहूर काहुर देऊन जाते हा अनुबंध.आई सोडून गेली..ती वेदना मन व्याकूळ करते."आईपणाला नसते सुरुवात,नसतो ते असतं अनादी अनंत,आई कधीच निवर्तत नसते, आपल्याच लेकरांच्या पोटी.ती पुन्हा पुन्हा जन्म घेते"(पृ.२१)ही अनादी अनंताची मातृत्वाची इश्वरी देणं आहे म्हणून हे विश्व आहे.बालपणीचं अमोघ मातृत्वाचं नातं जेव्हा नाळ घेऊन येतं.पण आईपण आपल्या सृजनशील हृदयात कायमचं असतं.आपले दुसऱ्याचे दुःख पाहुनी मन पाझरते म्हणजे आपल्या हृदयात मातृत्व असते.तिच आई असते 'पाच रूपयांची गोष्ट' "चोरी ती चोरीचं.पाच रूपयाची असो नायतर पाच पैशाची"(पृ.३१)जगण्याचं मोल हे अनमोल आहे.सत्यतेचा अनुभव चुका होत असतात वेळीच सावरल्या पाहिजे.प्रमाणिकपणा हा पैशाहुनही मोठा आहे.आई,आजो आणि स्त्री विषयक अतिशय सृजनशील भावनेचा ओलावा या ललित लेखात आहे.स्त्री बाईपण कसं मनस्वी असतं ते'हिरवं बोडक गोंदण आणि काळं ठसठशीत मंगळसूत्र'यात नात्याने मनहळवं करीत बाई कसं जगत असते.नात्याची गुंफण आज आपण विसरत चाललो."कपाळावरचं ते हिरवं बोडकं गोंदण मला बिलकुलच आवडायचं नाही.त्या जागेवर मी नेहमी कुंकवाचा लाल भडक टिळा पाहायचे.तिन्ही सांजवेळी दिवाबत्ती केल्यावर तिला कुंकू लावायचो.त्यावेळी ती कपाळाऐवजी गळा पुढे करायची.(पृ.५२)इथेच थांग लागतो पण मन कसे बाळमिठ्ठीचे नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय भावनेचे असते.ही माझी मावशी तिने मुसलमान नवरा केला म्हणून ती भेटतं नाही.पण तीमाझ्या आईची बहिण आहे माझी मा◌ो◌ं-वशी आहे.हे माणुसकीचं गहिवरले पण इथे आहे.'एकसौबीस हरी पत्ती लौंग आणि मी'हा ललितलेख म्हणजे जीवन उजळून कसे निघते व एक आनंदी जगण्याचा परिपाठ या लेखात आहे.तात्याने जे संस्कार दिले आईचे शब्द कायमचं उभारी देणारे आहेत जसे काम कोणतेच हलके नसते मन हलकट असते.मनवार विजय मिळवता आला पाहिजे आणि आपल्याचं कार्यमग्नतेत पानं खाताना जी तंद्री लागते इतकं जीवन मनमुराद आस्वादक जंगले पाहिजे.हरीपत्ती,लौंग आणि मी, आईच्या शब्दांची आठवण,"चोरी आणि शिंदळकी सोडून कुठल्याच कामाची लाज वाटली नाही पाहिजे (पृ.७६)या विचारात एक सृजनशील स्त्रीत्वाचा अनुभव आहे तो म्हणजे आत्मिक स्वानंद व जगनिंदेची परवा न करणे.'न सांगण्याची गोष्ट'यात लेखिकेने निर्भयपणे आपल्या मनातल्या भावना व्यक्त केल्या आहेत.आजही सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान व्यसनाधिनता करणारी लोकं आहेत.पण स्त्रीच्या बाबतीत अजूनही स्वच्छतागृहे सार्वजनिक ठिकाणी आहेत पण अत्यंत घान दुर्गंधीयुक्त आहे. प्रार्तविधी करण्यासाठी बाईपणचं एक वेदन लेखिका देऊन जाते.हगायला जायचं मग टमरेल,पाणी, आडोसा,ओढा नाली,खोंगळी उघड्यावर डुकरांचा सुळसुळाट किंवा संडासाचे दारकडी लाऊन पळणे.त्यात पाणी न टाकणे.गावाकडच्या गोष्टी आठवतात"मी कुठेतरी गेलेय.हा दरवाजा उघडतेय,तो दरवाजा उघडतेय.पण छे!पाय ठेवायला ही कुठे जागा नाहीय!(पृ.९०) स्त्री-पुरूष एकत्र आढळला की मोठा अजगर सापडावा इतक्या तिक्ष्ण भावना पूर्वी उमटत यातही निर्लेप निस्पृह मैत्री होती.मित्र हा स्त्री पुरुष होऊ शकतो.आजचे समकालीन वास्तव अतिशय वेगळे आहे जसे"आजकालची मुलंमुली तर अगदी सहज एकमेकांना मिठ्या मारतात ती आजची लाईफस्टाईल आहे.प्रेम व्यक्त करतात (पृ.१०१)पण पुढे हा मित्र दिसलाच नाही.त्याची मनस्वी आठवण मनाला व्याकुळ करते.'कोंबड्यांची गोष्ट' आजी आजोबा यांच्या घरी लहानपणी आई गेली.जे लेखिकेने अनुभवलं.कोबड्या पाळणे.त्यांची डागल्याखाली डाळणे,एक दिवस बागेतून घरी येण्याची उशीर होतो.अंधार पडतो.पिलं कुठं गेली असतील? लेखिकख व्याकुळ होते.पण पिल्लं दरवजात बसून राहतात.पिलांना जवळ घेऊन ती कुरवाळते मी पहिल्यांदा आई झाले.हा मातृत्वाचा अनुबंध प्रेम जिव्हाळा देऊन जातो.'घर असतंच की सोबत' स्त्री मनाच्या भावना घराशी किती गुंतलेल्या असतात.तिच्या घरातल्या प्रत्येक गोष्टीला स्पर्शाची जाणीव झालेली असल्याने तिचा आत्मा या वस्तू व वास्तूत गुंफलला असतो.घर छोटं असो की मोठं, तिचं मन त्यात सर्वव्यापी झालेले असते.रांगोळीची हौस तशीच राहते ही खंत व्यक्त केली आहे."भीती नाही वाटत एवढ्या मोठ्या घरात एकटीला?"तेव्हा माझ्याही नकळत मी बोलून जाते.एवढं मोठं तर घर आहे सोबतीला...भीती कशाला?"(पृ.१३२)ही सविनय स्त्री मनाची भावना इथे द्विगुणित होते.शेवटचा ललितबंध म्हणजे एक बाईपणाचं वैश्विक भावमूल्यांचं नातं उलगडून जातं.ते म्हणजे 'घर,अंगण,मी आणि ती' बायका आठवणी काढतात.त्यांची हात लागलेलेअसते.कान्याकोपऱ्यात, घरातली हरेक वस्तू असते त्यांच्या ठेवणीतली.अंगण त्यांचा आरसा असतो.त्या लखख ठेवतात.अगदी तसंच 'ती'ओंजळभरआठवणी ठेवून गेलेली.ती म्हणजे चित्रा."तेव्हा चित्राच्या आठवणीने तर उदास नसेल नं झाली ही लादी,जसा आईच्या मायेने फिरायचा, तसा त्यानंतर कुणाचाच फिरला नाही",(पृ.१४७)हे अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक भावनेचा ओलावा देणारं ललितलेखन.साहित्यिक नाटककार रवींद्र दामोदर लाखे यांची अतिशय मोलाची पाठराखण आहे "हे लेखन म्हणजे मराठी संस्कृतीचं, प्रादेशिकभाषेचं, गावजीवनाचं दस्तऐवजआहे.कालानुसार किंबहूना प्रदेशानुसार संस्कृती बदललेली दिसते.ते बदल या लेखानातून आपोआप टिपले गेले आहेत.रितिरिवाज आणि रितिसंस्कार यांचा परिपोष लेखिकेने मुद्दाम केलेला नाही.लेखिका स्त्री असल्यामुळे सर्व लेखनाला स्त्रीसुलभता आली आहे.परंतू स्त्रीसुलभ भावभावनांचं भांडवल किंवा स्त्री स्वातंत्र्यवादींचा आक्रोश या लेखात आढळत नाही.पुरुष आणि त्यांची नजर,त्याच्या नजरेतले स्त्रीला जाणवणारे बदल हे सहज स्मरणांतून या लेखांत निरिक्षणाच्या स्वरुपात व्यक्त होतात"(पाठराखण)तर या ललितसंग्रहाचे मुखपृष्ठ सरदार जाधव यांनी अतिशय आशय संपन्न 'पानदानी' दिली आहे. कवयित्री संगीता अरबुने यांच्या लेखनाचे हे पसायदान आहे.अनेक गौरवकिंत पुरस्कार प्राप्त झाले आहेत.मनस्वी हार्दिक शुभेच्छा.

पुस्तक:-एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी प्रकार:-ललितलेखसंग्रहलेखिका:-संगीता अरबुने प्रकाशक:-सुमती लांडे,शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर मुखपृष्ठ:-सरदार जाधव,प्रथमवृती:-मे २०२५किंमत:-३००/रुपये पाठराखण:-रवींद्र दामोदर लाखे पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना

# भुसावळ नगराध्यक्षा अपात्र: गायत्री भंगाळे यांचे जात प्रमाणपत्र अवैध



**भुसावळ** जळगाव जिल्ह्यातील भुसावळ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा गायत्री भंगाळे यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे. त्यामुळे सरकारने त्यांची नगरसेवक व नगराध्यक्षपदावरील निवड रद्द केली आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला जोरदार झटका बसला आहे.

भुसावळ नगरपरिषदेची निवडणूक नुकतीच झाली होती. त्यात राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने गायत्री भंगाळे यांना उमेदवारी दिली होती. त्यांनी राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या पत्नी रजनी सावकारे यांचा पराभव केला होता. या पराभवाची राज्यात जोरदार चर्चा झाली होती. पण रजनी सावकारे यांच्यासह भाजपच्या इतर काही पदाधिकाऱ्यांनी गायत्री भंगाळे यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेतला होता. त्यांनी उमेदवारी अर्जासोबत जोडलेले जात प्रमाणपत्र बोगस असल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यानंतर हे प्रकरण जिल्हा जात पडताळणी समितीकडे गेले होते.

जिल्हा जात पडताळणी समितीने या प्रकरणाची गंभीर दखल घेत या प्रकरणाची चौकशी केली होती. त्यांनी गायत्री भंगाळे यांच्या कागदपत्रांची बारकाईने चौकशी केली असता त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भातील आपला अहवाल राज्य सरकारकडे पाठवला. या अहवालावर तत्काळ कारवाई करत सरकारने गायत्री भंगाळे यांना नगरसेवक व नगराध्यक्ष पदासाठी अपात्र घोषित केले. या कारवाईनंतर गायत्री भंगाळे यांनी सरकारवर ही कारवाई राजकीय द्वेष व मंत्री संजय सावकारे यांच्या दबावाखाली करण्यात आल्याचा आरोप केला आहे.

गायत्री भंगाळे यांनी जिल्हा अनुसूचित जाती पडताळणी समितीच्या आदेशाला न्यायालयात आव्हान दिले आहे. या प्रकरणी मंगळवारी उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या सुनावणीनंतर भंगाळे यांच्या राजकीय भवितव्यासह आगामी पोटनिवडणुकीचे चित्रही स्पष्ट होणार आहे. न्यायालयाने समितीचा निर्णय कायम ठेवला तर पोटनिवडणुकीचा मार्ग मोकळा होईल. अन्यथा, भंगाळे यांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.